## "वसंतराव नाईक स्मृति सभागृह" नागपुर आरक्षणाबाबतची नियमावली

- **वसंतराव नाईक स्मृती सभागृह, नागपुर** शहारच्या धरमपेठ सारख्या मध्यभागी स्थित आहे. सदर सभागृहाची आसन क्षमता ३५५ असून लाकडी पृष्ठभागाचा रंगमंच आहे. आधुनिक साधनांनी युक्त असलेले हे सभागृह वातानुकूलित आहे. अत्याधुनिक तंत्राचे ऑडिओ व्हिडिओ सिस्टिम या सभागृहात कार्यान्वित असून ध्वनिक्षेपन यंत्रणा उत्कृष्ठ आहे. सभागृह इमारतीचे सभोवताल मुबलक प्रमाणात पार्किंग करिता जागा उपलब्ध आहे.
- प्रस्तुत सभागृहाचा वापर सांस्कृतिक व शैक्षणिक व्याख्याने, संमेलने, कार्यालयीन समिति, परिषद इत्यादि कार्यक्रमा साठी करता येईल.
- सभागृह वापरण्याची परवानगी अर्जदारास (कार्यालय/संस्था प्रमुख) माननीय संचालक, वनामती, नागपुर यांच्या कडून संबंधित आरक्षण लिपिक, वनामती नागपुर यांच्या मार्फत विहित नमुनात अर्ज करून प्राप्त करता येईल. कोणत्या प्रकारचा कार्यक्रम करावयाचा आहे याची माहिती आरक्षण करते वेळीच देणे सक्तीचे आहे.
- आरक्षण करतांना कार्यकमा साठी असणाऱ्या पूर्ण जबाबदार दोन व्यक्तींची ओळखपत्र देऊन त्यांचे पूर्ण पत्ता/ मोबाइल क्र. देणे बंधनकारक आहे.
- सभागृहाचे आरक्षण जास्तीत जास्त कार्यक्रमाचा १५ (पंधरा) दिवस आधी करता येईल.कार्यक्रमा करिता लागणारे सर्व आवश्यक परवाने व इतर सर्व मान्यता संबंधित विभागाकडून घेण्याची जबाबदारी अर्जदारावर राहिल.
- सभागृहाचे आरक्षण सकाळी १०.०० ते दुपारी २.०० व दुपारी ३.०० ते सायंकाळी ७.०० या कालावधी साठी करण्यात येईल प्रत्येक कालावधी करिता वेगळे आरक्षण भाडे राहिल, पूर्ण रक्कम भरल्यावर पावती प्राप्त केल्याशिवाय आरक्षण पक्के झाले असे समजल्या जाणार नाही.
- उपरोक्त दरामध्ये सभागृहातील स्टेज, स्टेज लाइट, स्पॉट लाइट, खुर्च्या, वातानुकूलित यंत्रणा, संपूर्ण साऊंड सिस्टिम व ऑपरेटर्स यांचा संपूर्ण खर्च यात समाविष्ट आहे. स्टेज लाइट व संपूर्ण साऊंड सिस्टिम वनामती संस्थेने नेमलेले ऑपरेटर्स हाताळतील. कोणत्याही परिस्थितीत बाहेरील साऊंड सिस्टिम व ऑपरेटर्स यांचा सभागृहात प्रवेश निषिद्ध आहे.
- जास्तीची विद्युत व्यवस्था तसेच कार्यक्रम करावयाचा असल्यास कार्यालया कडून पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे, कोणत्याही कारणास्तव विद्युत पुरवठा खंडित झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. अशा प्रसंगी पर्यायी व्यवस्था करणे हे आरक्षण कर्त्याची जबाबदारी राहिल.
- सभागृहात उपलब्ध सोयी व्यतिरिक्त लागणारी व्यवस्था अर्जदारास करावी लागेल,सभागृहाची कुठल्याही प्रकारच्या नुकसानाची आणि त्याच्या भरपाईची कायदेशीर जबाबदारी अर्जदारावरचराहील.नुकसानाची भरपाई अर्जदारच्या अनामत रक्कमेतून करण्यात येईल. नुकसान भरपाई अनामत रक्कमेतून पूर्ण न झाल्यास नुकसान भरपाईची उरलेली रक्कम थकबाकी म्हणून अर्जदाराकडून वसूल करण्यात येईल. नुकसानाच्या रकमेबाबत मा. संचालक वनामती नागपुर यांचा निर्णय अंतिम राहील.
- जमा केलेली भाडेची रक्कम परत केली जाणार नाही. काही कारणास्तव आरक्षित तारीख बदलून हवी असल्यास तसा लेखी अर्ज करावा लागेल. हवी असलेली तारीख मोकळी असल्यास तारीख बदलून द्यायचा विचार होईल.
- अर्ज दाराने सभागृहाचा भिंती अथवा इत्तर ठिकाणी कुठेही खिळे भिंती पत्रके चिकटवू नये. कार्यक्रमाची जाहिरात नेमून दिलेल्या स्थळीच पत्रके लावून करावी.
- कार्यक्रमात प्रत्यक्ष भाग घेणारे आमंत्रित, अर्जदाराचे प्रतिनिधी यांच्या शिवाय इतरांना रंगमंचच्या आजुबाजुस अथवा रंगमंचावर गर्दी करण्यास मज्जाव राहील.
- सभागृह व परिसरात कोणत्याही प्रकारचे स्थायी/ अस्थायी बांध-काम, मंडप, इत्यादि उभारू नये.
- सभागृहात थुंकण्यास, धूम्रपानास तसेच खाद्यपदार्थ नेण्यास मनाई आहे. गरम पेय अथवा शीत पेय व खाद्यपदार्थ वनामती संस्थेच्या अधिकृत कॅटरर्स तर्फे निर्धारित दराने *snack counter* वर विकत मिळण्याची सोय केली आहे.

वरील पदार्थ बाहेरून आणण्यास तसेच अधिकृत कॅटरर्स शिवाय बाहेरील कॅटरर्सला सभागृह व परिसरात पदार्थ पुरविण्याची मनाई आहे.

- सर्व वाहने पार्किंगच्याच ठिकाणी ठेवण्यात यावी. कार्यक्रमा करिता परिसरात ठेवण्यात आलेल्या वाहनांची जबाबदारी अर्जदारची राहिल.
- सभागृहातील स्टेज समोरील मोकळया जागेत आवश्यकते नुसार आयोजक सोफा सेट स्वखर्चाने ठेवू शकतात.
- कोणत्याही परिस्थितीत मेणबत्ती, आगपेटी, उदबत्ती, दिवे हे ज्वलनशील साहित्य सभागृहात आणू नये. फक्त उद्घाटन प्रसंगी रंगमंचावर दिपप्रज्वलन करणे गरजेचे असल्यास त्यास बंधन नाही.
- सभागृहातील बैठक व्यवस्था रंगमंच, साऊंड सिस्टिम, स्टेज लाइट सिस्टिम, एयर कंडिशनिंग इ. व्यवस्था उत्कृष्ट स्थितीत कार्यान्वित आहे. परंतु यंत्रात आकस्मिक बिघाड झाल्यास व त्यामुळे कार्यक्रम बंद पडल्यास संस्था जबाबदार राहणार नाही.
- अर्जदाराने आरक्षित केलेल्या कालावधीनंतर तासाच्या आत सभागृह खाली करावे लागेल. आरक्षणाच्या कालावधीनंतर कार्यक्रम सुरू असल्यास प्रत्येक अर्ध्या तासाला रु. ३,०००/- दंड आकारण्यात येईल. रसिस्टर मध्ये सभागृहाचा ताबा घेण्याची व सोडण्याची वेळ नोंद करून सही करणे ही जबाबदारी अर्जदाराची राहील.
- सभागृहात बैठक व्यवस्थेपेक्षा जास्त गर्दी आयोजकांनी करू नये. बैठक व्यवस्थेपेक्षा जास्त व्यक्तींनी सभागृहात प्रवेश बंदी राहील.
- वरील नियम व अटी शिथिल करण्याचे पूर्ण अधिकार मा. संचालक, वनामती यांना राहतील.